शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रकरणाच्या
पोलीस तपासाबाबत सूचना.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-०८१७/५७२०/प्र.क्र.१४०/विशा-१अ

दुसरा मजला, मंत्रालय (मुख्य इमारत),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १६ सप्टेंबर, २०१७.

<u>वाचा</u>:- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्र. पोमसं/२४/३४/शेतकरी आत्महत्या/१०५/१६, दि. ३०.३.२०१६ व दि. १०.११.२०१६.

<u>परिपत्रक</u>:

शेतकरी आत्महत्याबाबतची प्रकरणे ही तपासासाठी पोलीस उपनिरीक्षक वा त्यावरील दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्याकडे देण्याबाबतचे आदेश पोलीस महासंचालक कार्यालयाने संदर्भाधीन आदेशान्वये सर्व पोलीस आयुक्त व सर्व पोलीस अधिक्षक यांना दिले आहेत.

"आत्महत्याग्रस्त शेतकरी व शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत" अध्यक्ष, कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, महाराष्ट्र राज्य, अमरावती व मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव यांच्या दि. १६.८.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून तात्काळ नुकसान भरपाई मिळण्यासंदर्भात काही सूचना केल्या आहेत. त्यानुसार शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रकरणात पोलीस विभागाकडून पुढील सूचनानुसार कार्यवाही करावी.

१. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याला लवकरात लवकर नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीकोनातून शेतकऱ्याच्या आत्महत्येचे कारण तात्काळ शोधणे आवश्यक आहे. त्यासाठी पोलिसांनी तात्काळ शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे कारण शोधावे.
२. शेतकरी आत्महत्येच्या प्रकरणात न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोग शाळेने दोन दिवसात त्यांचा अहवाल सादर करावा.
३. शेतकरी आत्महत्येच्या प्रकरणात संबंधित पोलीस निरीक्षक (PI) / सहायक पोलीस निरीक्षक (API) यांनी प्रत्यक्ष भेट देवून सदर प्रकरणाच्या तपासाबाबत आवश्यक त्या सूचना व मार्गदर्शन करावे तसेच सदर तपासाबाबत योग्य ती दक्षता घ्यावी.
४. शेतकरी आत्महत्येच्या प्रकरणाबाबतची सर्व कार्यवाही एका आठवड्यात पूर्ण करण्याची सर्व पोलीस अधिक्षक / पोलीस आयुक्त यांनी दक्षता घ्यावी.

यासंदर्भातील केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विनाविलंब संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१७०९१६१६५५१६९५२९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhanudas B. Ingale

Digitally signed by Bhanudas B. Ingale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f8f9b8078a26fcd5e6693203d1bf5c64b5230b5886b5a2a443daceb6d447c6dc, cn=Bhanudas B. Ingale
Date: 2017.09.16 16:45:06 +05'30'

(भा. बा. इंगळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) अध्यक्ष, कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, महाराष्ट्र राज्य, विभागीय आयुक्त कार्यालय, बायपास रोड, अमरावती.
२) मा. मुख्यमंत्री महादयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई.
४) विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था), पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, मुंबई.
५) विशेष पोलीस महानिरीक्षक सर्व परिक्षेत्रे.
६) जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी (सर्व)
७) पोलीस आयुक्त, (सर्व)
८) संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, सांताक्रुझ, मुंबई.
९) जिल्हा पोलीस अधिक्षक (सर्व)
१०) सहसंचालक/उपसंचलक, विभागीय न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, (सर्व).
११) निवड नस्ती, कार्यासन विशा-१अ, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.